**महावितरण कंपनीला महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांचेमार्फत अटल सौर कृषि पंप योजना अंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अनुदान वितरित करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१९/प्र.क्र. ६०/ऊर्जा-७.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०६ मार्च, २०१९.

<u>वाचा :-</u>

१) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.सौरप्र-२०१४/प्र.क्र.२१९/ऊर्जा-७, दि.२७.०३.२०१५ व दिनांक १४.०६.२०१७
२) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.सौरप्र-२०१६/प्र.क्र.३१९/ऊर्जा-७, दि.०४.११.२०१६
३) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांचे क्रमांक: लेखा / बीपी-०३४ / सौर कृषि पंप/१८-१९ /२८७, दिनांक २४/०१/२०१९ चे पत्र.
४) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८.
५) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २५ जानेवारी, २०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्र शासनाने राष्ट्रीय स्तरावर १ लाख नग सौर कृषीपंपाच्या योजनेसाठी रू. ४००.०० कोटी एवढी तरतूद घोषित केली होती. या अंतर्गत राज्यासाठी केंद्र शासनाने त्यांचे पत्र दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी ६१४० नग, दिनांक ३० डिसेंबर, २०१४ रोजी १,४०० नग व दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी २,४६० नग असे एकूण १०,००० नग सौर कृषीपंप आस्थापित करण्यासाठी मंजुरी दिलेली होती. त्यास अनुसरून एकूण १०,००० नग सौर कृषीपंपाचे उद्दिष्ट निश्चित करून उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये राज्याचे सौर कृषीपंप आस्थापित करण्याचे एकत्रित धोरण जाहीर करण्यात आले. सदर शासन निर्णयातील नमूद अटी व शर्तींबाबत योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन काही अटी व शर्तींमध्ये सुधारणा/बदल करून त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये अटी व शर्तींमध्ये अंशत: बदल करण्यात आला.

२. केंद्र शासनाने विविध टप्प्यात मंजूरी दिलेल्या १०,००० नग सौर पंप आस्थापित करण्यासाठी सौर कृषीपंपाची योजना राज्यामध्ये महावितरण कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. अटल सौर कृषिपंप योजनेबाबत सुकाणू समितीने घेतलेल्या निर्णयानुसार ज्या लाभार्थ्यांनी या योजनेअंतर्गत त्यांचे अंशदान भरले आहे त्यास कृषीपंप देण्याच्या उद्देशाने ५६५० या संख्येवर सदर योजना सिमित करुन दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत ५६५० नग सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले होते, तथापि सदर योजनेंतर्गत प्रत्यक्ष ५६६२ नग सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले आहेत. आस्थापीत केलेल्या ५६६२ नग सौर कृषी पंपांची एकूण किंमत रुपये ३२०.२७३१ कोटी असून सदर रक्कमेच्या ५% राज्य शासनाचा हिस्सा रुपये १६,०१,३६,५५०/- देय ठरतो. त्यापैकी ६,३६,००,०००/- रक्कम महाउर्जाकडून महावितरण कंपनीकडे वर्ग करण्यात आली असून उर्वरित रक्कम रुपये ९,६५,३६,५५०/- उर्वरित रक्कम रुपये ९,६५,३६,५५०/- वितरीत करण्याबाबत महाउर्जाने उपरोक्त

संदर्भ क्र. ३ अन्वये शासनाकडे मागणी केली आहे. त्यानुषंगाने रुपये ९,६५,३६,५५०/- तरतूद वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

केंद्र शासनाने सौर कृषी पंप आस्थापित करण्याच्या "अटल सौर कृषि पंप योजना" म्हणून मंजूरी दिलेली योजना महावितरण कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत ५६६२ नग आस्थापीत केलेल्या पारेषण विरहित सौर कृषिपंपाच्या रुपये ३२०.२७३१ कोटी किंमतीनुसार राज्य शासनाचा ५ टक्के हिस्सा रुपये ९,६५,३६,५५०/- (रुपये नऊ कोटी पासष्ठ लक्ष छत्तिस हजार पाचशे पन्नास फक्त) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई (महावितरण) यांना सुपूर्द करण्यासाठी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांना वितरित करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम अदा करण्यासाठी श्री. उ. द. वाळुंज, सह सचिव (ऊर्जा), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्री. ना. रा. ढाणे, अवर सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे (Director General, Maharashtra Energy Development Agency, Pune) यांच्या नावे अदा करण्यात यावा. त्यानी सदर निधी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई (महावितरण) यांना सत्वर उपलब्ध करुन द्यावा.

४. सौर उर्जा कृषिपंप बसविण्याचा कार्यकम अंतर्गत विविध योजनेवरील खर्चाचा, उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्यता याबाबतच्या माहितीसह मासिक व त्रैमासिक अहवाल लगतच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत महावितरणने महाउर्जामार्फत शासनास सादर करण्यात यावा. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या निधीची रक्कम केवळ सौर उर्जा कृषिपंप बसविण्याचा कार्यकम अंतर्गत विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी खर्च करण्यात येईल याची महाउर्जाने खातरजमा करण्यात यावी.

५. सदर निधीच्या लेख्यासंबंधीची कागदपत्रे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई.यांनी आवश्यक तेव्हा महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत.

६. याबाबतचा खर्च "मागणी क्रमांक-के-६, २८१०, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, ०२, सौर १०२, प्रकाश होल्ट, (०१) सौर उर्जा कृषिपंप बसविण्याचा कार्यकम (०१)(०१) सौर वीजेवरील कृषि पंप बसविण्यासाठी सहायक अनुदान (कार्यक्रम), (राज्य हिस्सा ५ %) ३३ अर्थ सहाय्य (२८१००९०२)" या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

७. सौर उर्जा कृषिपंप बसविण्याचा कार्यकम अंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांना निधी वितरीत करतांना महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१८ शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं-२०१८ /प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८ च्या परिशिष्टातील तपासणी सूचीमधील अ.क्र. ३ व ९ येथील अटींची व या परिपत्रकातील परिच्छेद क्र.७ मधील प्रत्येक अटीची पूर्तता होत असून, शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९ /अर्थ-३, दि. २५ जानेवारी, २०१९ मधील सूचनांनुसार अर्थसंकल्पित तरतूदीच्या कमाल ८० टक्केच्या मर्यादेत विभागाला प्राप्त अधिकारात सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०६१४३७०५७२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Nanasaheb Rajaram Dhane
Date: 2019.03.06 14:40:00 +05'30'

**( ना. रा. ढाणे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई.
२. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, सर्व्हे नं. १९१-ए- फेज, येरवडा, पुणे- ४११ ००६.
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, ( लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), मुंबई- ४०० ००१
४. महालेखापाल, महाराष्ट्र-२, ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. अवर सचिव ( रोख/प्रशासन ), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.३२
९. अवर सचिव ( ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. निवड नस्ती, ऊर्जा-७.